# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

**(Govt. of Maharashtra Undertaking)**

जा. क्र. मप्राशिप/सशिअ/विशेष प्रशिक्षण/२०१७-१८/१३१६ दिनांक : 16 JUN 2017

**विषय : शाळाबाह्य मुलांना वयानुरूप वर्गात प्रवेश देऊन विशेष प्रशिक्षण देणेबाबत.**

**संदर्भ : परिपत्रक क्र. मप्राशिप/सशिअ/विशेष प्रशिक्षण/२०१६-१७/१६०९, दि. ०४/०७/२०१६.**

१) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत १०० टक्के मुलेशाळेत दाखल होऊन, नियमित उपस्थित राहून, गुणवत्तापूर्ण शिकतील यासाठी यंत्रणा जोमाने काम करत आहे. त्याचेच फलित म्हणजे राज्यातील ठराविक तालुके व जिल्हे स्वत:ला शाळाबाह्य मुले विरहीत म्हणून घोषित करत आहेत. तरीसुद्धा सन २०१७-१८ च्या नियोजनाच्यावेळी ७८,५०१ मुले शाळाबाह्य असल्याचे दिसून येते. शाळाबाह्य मुलांच्या आकडेवारीबद्दल वेगवेगळ्या शैक्षणिक दर्शकांशी तुलना केली तर कदाचित ही संख्या जास्त असण्याची शक्यता आहे.

२) जनगणना-२०११ मधील ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांची लोकसंख्या व यु-डाईसमध्ये दाखल मुलांच्या आकडेवारीची तुलना केली असता त्यामध्ये ४.२० लाख एवढी तफावत दिसून आली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने शाळाबाह्य मुलांची आकडेवारी निश्चित करण्यामध्ये अडचणी येत आहेत. याबाबत आपल्या स्तरावरून अशा मुलांचा शोध घेऊन त्यांना नियमित शाळेत दाखल करावे व त्यांची सरल प्रणालीमध्ये नोंद करण्यात यावी.

३) शाळाभेटीच्या दरम्यान असेही निदर्शनास आले की, एका गावातील जवळपास ८०-९० मुले सातत्याने गैरहजर आहेत. परंतु, त्यांची खोटी हजेरी दाखविली जाते. याच्या मुळाशी जाऊन त्याचे विश्लेषण केले असता व प्रत्यक्ष अशा मुलांशी चर्चा केली असता ही मुले वर्षानुवर्षे, महिनेनुमहिने शाळांमध्ये येत नाहीत. त्याच्या कारणांचा उलगडा केला असता, मुलांना ती शाळा आवडत नाही, त्या शाळेमधून मुलांना अपेक्षित शिक्षण मिळत नाही, समाज, पालक व शाळा यांमध्ये मोठी दरी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक यांमध्ये वैचारिक मतभेद, वादविवाद अशा गोष्टी निदर्शनास आल्या. पर्यायाने यामध्ये मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे १०० टक्के मुलांना शाळेत टिकवून ठेवण्यासाठी मुलांना आवडेल असे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याशिवाय गत्यंतर नाही.

४) यापुढे शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण न करता त्यांचा शोध यंत्रणेकडून घेतला जाईल. वर्षभरात कधीही एखादे मूल शाळाबाह्य आढळले तर त्यास नियमित शाळेत दाखल करून यु-आयडी आधार क्रमांक व सरल क्रमांक देऊन त्यास योग्य पद्धतीने शिक्षण दिले जाईल याची खातरजमा करावी.

५) भारत सरकारने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात वरील शाळाबाह्य मुलांपैकी ७५ टक्के मुले नियमित शाळेत दाखल करण्याचे व गळतीचा दर ०.४ टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट राज्याला दिले आहे.



सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

६) सर्व शिक्षा अभियान म्हणून या सर्व शाळाबाह्य मुलांना नियामित शाळेत दाखल करून त्यांची नियमित उपस्थिती टिकवून त्यांना त्यांच्या वयानुरूप वर्गासाठी निर्धारित संपादणूक पातळी गाठण्याकरिता आवश्यक विशेष शैक्षणिक सहाय्य देण्याकरिता विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शिक्षण हक्क कायद्याने आपणांवर बंधनकारक आहे.

७) शाळाबाह्य मुलांना नजिकच्या नियमित शाळेत दाखल करून त्यांचे यु-आयडी आधार काढण्यात यावेत. त्यांची उपस्थिती या माध्यमातून संनियंत्रित करण्यात यावी. या मुलांना वाचन-लेखन व गणितातील मुलभूत क्रिया अवगत होण्याकरिता महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाने विकसित केलेल्या शैक्षणिक कृती आराखड्याचा उपयोग करण्यात यावा. यासाठी शिक्षकांनी त्यानुसार स्वत:ला अधिक समृद्ध करावे. या मुलांना विशेष प्रशिक्षणाच्या माध्यमातून अधिकचे शैक्षणिक सहाय्य करताना प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमातील तत्त्वांशी विसंगत कृती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

८) दिनांक ०९ जानेवारी, २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासाठी काम केलेल्या व परिणाम मिळालेल्या शिक्षकांना बालरक्षक म्हणून कार्य करण्याची संधी देण्याकरिता महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाकडून ऑनलाईन लिंकद्वारे माहिती संकलित करण्यात आली. त्यानुसार या बालरक्षकांना समता मूलक विचारांच्या माध्यमातून शाळाबाह्य मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्षम करण्यात येणार आहे.

९) तोरणमाळ, जिल्हा नंदुरबारमधील जीवन कौशल्य या कार्यक्रमाची यशस्विता विचारात घेऊन त्याची अंमलबजावणी शाळाबाह्य मुले तुलनेने जास्त असणाऱ्या १० जिल्ह्यांमध्ये करण्यात येणार आहे. याबाबतचे नियोजन व कृती आराखडा महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांच्या स्तरावरून करण्यात येत असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१०) जिल्हा परिषद व महानगरपालिकांसाठी मंजूर भौतिक लक्ष्य व आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. भौतिक व आर्थिक तरतुदीचे निकष वित्तीय नियमावलीच्या मर्यादेत लागू राहतील.

११) सर्व शिक्षा अभियानांतर्गत १२ महिन्याकरिता ५६ मुलांसाठी, ६ महिन्याकरिता ४५,२६० मुलांकरिता व ३ महिन्याकरिता १,२०३ मुलांसाठी अशी एकूण ४६,५१९ मुलांसाठी दि. ०९/०२/२०१७ रोजी झालेल्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीत विशेष प्रशिक्षणाकरिता तरतूद मंजूर आहे. सदर संपूर्ण तरतूद राज्य स्तरावर राखीव ठेवण्यात येत आहे. याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. राज्यस्तरावर राखून ठेवण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर जे.व्ही. द्वारे खर्च सर्व जिल्हा परिषद व महानगरपालिकांना या कार्यालयाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

१२) राज्यात सध्या डिजीटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक, प्रगत शाळा, स्पोकन इंग्लिश, शाळा सिद्धी, समाज सहभाग, वाचन प्रेरणा दिवस यासारख्या चळवळी (Movements) सुरू आहेत. यातून साध्य होणाऱ्या परिणामांचा लाभ या मुलांनाही प्राप्त झाला पाहिजे. त्यादृष्टीने योग्य नियोजन करून कार्यवाही करण्यात यावी.

१३) महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांचेकडून भाषा व गणित या विषयातील संकल्पना समृद्धीकरणासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये शैक्षणिक साहित्याच्या प्रभावी वापरातून प्रत्येक मूल निर्धारित संपादणूक पातळी गाठू शकेल याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचाही संबंधित शाळेतील शिक्षकांना व मुलांना लाभ मिळेल याची खात्री करावी.

१४) शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासाठीही योग्य पद्धतीने मूलनिहाय कृती कार्यक्रम आखून अपेक्षित अध्ययन संपादणूक पातळी साध्य करण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत स्थानिक प्राधिकरण स्तरावरून काम झाल्यास १०० टक्के मुले शाळेत दाखल करून नियमित उपस्थिती राखून गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याचे उद्दिष्ट निश्चितच सफल होईल.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
५) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
७) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).